## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १६ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत आयोजित आंतरविभागीय मैदानी क्रीडा स्पर्धांचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या प्रा.पवित्रा पाटील, प्रा. किशोर पवार, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यापीठाचा ध्वज आणि जळगाव विभागाचा ध्वज फडकविण्यात आला. त्यानंतर सहभागी खेळाडूंनी शिस्तबद्ध पद्धतीने मार्चपास्ट सादर केला. क्रीडाज्योतीच्या मशाल रॅलीने स्पर्धेच्या उत्साहात भर घातली. या दिमाखदार सोहळ्यात स्पर्धांचे अधिकृत उद्‌घाटन करण्यात आले.

मार्गदर्शन करताना कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी म्हणाले की, खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संघभावना आणि संघर्ष करण्याची वृत्ती विकसित होते. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडाक्षेत्रातही प्रगती साधावी. खेळाडूंनी अभ्यासासोबत क्रीडाक्षेत्रातही प्रगती करावी, क्रीडा कौशल्याच्या बळावर अनेक खेळाडूंना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. त्यामुळे खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर यश संपादन करावे. आगामी स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून विद्यापीठाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन त्यांनी केले. सहभागी सर्व खेळाडूंना त्यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविक डॉ. दिनेश पाटील यांनी केले, तर यावेळी प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विजयी खेळाडू यांना पारितोषिक देण्यात आले. या आंतरविभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत विद्यापीठांतर्गत चार विभागांतील एकूण १८५ विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये जळगाव विभागातील २५ मुले व २२ मुली, एरंडोल विभागातील २५ मुले व २२ मुली, धुळे विभागातील २५ मुले व २१ मुली, तर नंदुरबार विभागातील ३० मुले व १८ मुली सहभागी झाले.

या स्पर्धांच्या माध्यमातून खेळाडूंना आपली क्रीडाक्षमता दाखविण्याची, स्पर्धात्मक अनुभव मिळविण्याची आणि पुढील स्तरावरील स्पर्धांसाठी तयारी करण्याची संधी उपलब्ध झाली. खेळाडूंच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि क्रीडामय वातावरणामुळे उद्‌घाटन सोहळा उत्साहात पार पडला. या स्पर्धांमधून खेळाडूंना उत्कृष्ट कामगिरीची प्रेरणा मिळून विद्यापीठाच्या क्रीडा परंपरेला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पंच म्हणून प्रा. शैलेश पाटील, प्रा. हसीन तडवी, प्रा. व्ही. के. पाटील, प्रा. मुकेश पवार, प्रा. उमेश पाटील, प्रा. क्रांती वाघ, प्रा. हर्षदा पाटील, प्रा. विनय पवार, प्रा. अमोल पाटील, प्रा. तारक दास, प्रा. नीलिमा पाटील, प्रा. प्रियंका सुलाखे, अमर हटकर आणि प्रा. संजय चौधरी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुभाष पवार यांनी केले.

…………………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**